| MHPU180007892015 | लताबाई गाढवे<br>विरूध्द<br>बबन दोरगे व इ. |
|---|---|

## निशणी क्र.११६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी ने मयत प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे यांचे वारस अभिलेखावर घेतले नसल्याने त्यांचे विरूध्द दावा ॲबेट झाल्याने, सदर आदेश रद्द होवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे हे दिनांक २१.०४.२०२१ रोजी मरण पावले. सबब, मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर न घेतल्याने दावा ॲबेट झाला आहे. सदर हुकूम रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदर आदेश रद्द झाल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. उलट खरी परिस्थिती मे. कोर्टासमोर येवून सदरचा दावा कायद्याने चालणार आहे. करीता, अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांचे म्हणणेनुसार अर्जात कोणतेही कायदेशीर कारण नमुद नाही. तसेच, ॲबेट आदेश रद्द करणेच्या अर्जास अशील झाला आहे. त्याकामी उशीर माफीचा अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.५ छबुबाई महादेव मेमाणे ह्या दिनांक २१.०४.२०२१ रोजी मरण पावल्या असुन त्याची माहिती प्रतिवादींनी दिली नाही. सदरचा दावा जाहीर ठराव, निरंतर मनाई, ताबा व कायदेशीर वाटपपत्राचा आणि पोकळीस्त खरेदीखत तसेच, पोकळीस्त हक्कसोडपत्र रद्द होण्याकरीता दाखल केला आहे. मयत प्रतिवादी क्र.५ यांचा दाव्यामध्ये हिस्सा असल्यामुळे त्यांना दाव्याच्या प्रक्रियेतुन वगळता येणार नाही. सदर प्रकरणात वादीने दाखल केलेल्या अबेटमेंट सेट असाईडच्या अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक आहे. तसेच सदरचा दावा हा अचल संपतीच्या अनुशंगाने वाटप व निरंतर मनाईकरीता असल्याने सदर मयत प्रतिवादी

क्र.५ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंट सेटअसाईडचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. करीता, उपरोक्त चर्चेवरुन मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. निशाणी ११६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.५ यांचेविरुध्द पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.31 17:43:10 +0530

ठिकाणः दौंड, **(एस.एन. पाटील)**

दिनांक ३०/०७/२०२६ २रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

दौंड, ता.दौंड, जि.पुणे